निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ रुल १ व २ तसेच कलम १५१ अन्वये तात्पुरता मनाई हुकुमाकरीता केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन याप्रमाणे आहे की, वादीच्या मालकी व कब्जात वडीलोपार्जित घर मालमत्ता मौजा वाघोडा, ता. कारंजा, जि. वर्धा येथे स्थीत असुन त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे. ...

मौजा व ग्रामपंचायत वाघोडा, येथील घर क्र. ३०

आराजी –४० × २५ = १००० चौ. फुट त्यावर बांधलेले जूने घर व खाली जागा.

चतुःसिमा:

पुर्वेस – पांधण,

पशिचमेस – मधूकर हजारे यांचा कोठा

उत्तरेस – प्रतिवादीचे शेत सव्हे नं. १९७,

दक्षिणेस – मनोहर श्रीराम कामठीचे घर

सदर जागेवरील घरमालमत्ता ही वादीचे आजोबा कोलबा इसनाजी हजारे यांनी बांधलेली असुन त्यांच्या मालकी व कब्जात होती. कोलबा यांना गंगाराम व आत्माराम असे दोन मुले होते. वादी हा गंगारामचा मुलगा असून बाबाराव हजारे हा आत्मारामचा मुलगा आहे. कोलबा मरण पावल्यानंतर वादातील मिळकत गंगाराम कोलबा हजारे यांच्या नावाने आली नंतर गंगाराम कोलबा हजारे यांनी ती मालमत्ता वादीच्या नावाने करुन दिल्यामुळे दि. १०.०२.२००४ रोजीच्या ठरावाने ती मालमत्ता वादीच्या नावाने आली. सदर वाद मिळकतीच्या वादी कब्जात आहे. सदर घर मालमत्तेला लागून वादीची काही खाली जागा आहे. सदर जागा ही वादीच्या घरासमोर असून घरामध्ये जनावरे किंवा इतर प्राणी जावू नये याकरीता घराच्या रक्षणार्थ त्या जागेमध्ये वादीला ताराचे कुंपण करावयाचे आहे. त्यामुळे दि. ०४.०८.२०२१ रोजी कुंपण करण्याच्या हेतुने त्यांनी लोखंडाचे खांब लावीत असतांना प्रतिवादी क्र. १ ने वादीला कुंपण करण्यास अडथळा करुन शिवीगाळ

केली. घराला कुंपण केले तर घर पाडुन टाकण्याची व बळजबराईने घराचा ताबा घेण्याची धमकी दिली. वादीने सदर घटनेचा रिपोर्ट पोलीस स्टेशन कारंजा येथे दिली. परंतु पोलीसांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दि.०५.०८.२०२१ रोजी वकीलांमार्फत नोटीस पाठविली. वादी प्रतिवादीच्या शेताच्या जागेत खांब लावून कोणतेही अतिक्रमण करीत नाही, तसेच कब्जा घेण्याच्या प्रयत्नात नाही. वादीच्या घरासमोर वादीची खाली जागा असून त्या जागेच्या रक्षणार्थ वादी कुंपण करीत असल्याने प्रतिवादींनी वादीला अडथळा करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. वादीची प्रथमदर्शनी केस आहे. वादीने घराला कुंपण केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. याउलट प्रतिवादींनी वादीच्या घराला पाडण्याचा प्रयत्न करुन कुंपण करण्यास अडथळा केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल. न्यायाचा तराजू वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे वादीला प्रतिवादीविरुध्द प्रस्तुतचा कायमस्वरुपी मनाई हुकुमाकरीता दावा दाखल करावा लागला. वादीचे घर व खाली जागेवर असलेल्या वादीच्या कब्जास प्रतिवादींनी कोणताही अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम पारित करण्यात यावा अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाव्यास नि. क्र. १९ अन्वये लेखी बयाण तसेच घोषणेकरीता व कायमच्या मनाई हुकुमाकरीता प्रतिदावा दाखल केला आहे. तसेच प्रतिवादीच्या लेखी बयाणाला त्यांचे मनाई हुकुमाच्या अर्जाचे उत्तर समजण्यात यावे अशी नि. क्र. २१ अन्वये पुरसिस दिली आहे. प्रतिवादीचे थोडक्यात कथन याप्रमाणे आहे की, वादी हे प्रतिवादीचे वडील मधुकर यांचे सख्खे लहान भाउ असून प्रतिवादी क्र. १ व २ यांचे काका आहेत. वाद मालमत्तेचे बांधकाम वादीचे आजोबा कोलबा यांनी केला असून वाद मालमत्ता ही कोलबा यांची स्वकष्टार्जीत मालमत्ता होती. सदर मालमत्तेवर वादीचे वडील गंगाराम यांचा कोणताही हक्क नाही. कोलबा यांनी जिवंतपणे वाद मालमत्ता त्यांचा नातू बाबा हजारे यांचे नाव नोंदणीकृत मृत्यूपत्राव्दारे करुन दिलेली आहे. वादीच्या वडीलांनी

आत्माराम यांच्या वारसानांच्या गैरहजेरीचा फायदा घेवून व ग्रामपंचायतचे पदाधिकारी यांना हाताशी घेवून खोटे व बनावटी नोंद केलेली आहे. वाद मालमत्ता ज्या शेतात आहे ते संपुर्ण शेत प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कोलबा यांचे कायदेशीर वारस बाबा हजारे यांच्याकडून दि.०१.०१.२०२१ रोजी पंजीबध्द खताव्दारे खरेदी केलेले आहे. प्रतिवादीचे वडील मधुकर व बाबा यांचे चांगले संबंध असल्यामुळे गोठा बांधण्याकरीता जागा पुर्वीच दिलेली आहे. वादी वाद घराचा कधीही ताबा घेतलेला नाही. वाद मालमत्तेच्या उत्तर व पुर्व दिशेला लागून कोणतीही खाली जागा नाही. सदर वाद मालमत्तेच्या उत्तरेस प्रतिवादीचे जनावरे व शेती योग्य सामान ठेवण्यासाठी गोठा आहे. त्यामुळे वाद मालमत्तेच्या उत्तरेस खाली जागा असल्याचा प्रश्न निर्माण होत नाही. वादीने दि. ०४.०८.२०२१ रोजी बळजबराईने वाद मालमत्तेचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादींच्या मालकीची मालमत्ता हडप करण्याच्या प्रयत्नात वादी आहे. त्यामुळे प्रतिवादींनी वादीला दि. ०५.०८.२०२१ रोजी वकीलांमार्फत नोटीस दिलेली असून सदर नोटीसला वादीने कोणताही उत्तर देण्याची तसदी घेतलेली नाही. कोलबा यांची स्वकष्टार्जीत मालकीची मौजा वाघोडा येथे शेत सर्वे क्र. ७५/१ (नविन १९७ आराजी ०.०८ हेक्टर आर) अशी शेतजमीन होती. सदर शेतजमीनीत कोलबा यांची गुरे व शेती साहीत्य ठेवण्याकरीता गोठा होता व आहे. कोलबा यांचा मुलगा आत्माराम यांचे अल्पवयात निधन झाल्याने कोलबा यांनी ती शेत मालमत्ता व इतर शेत मालमत्ता मय्यत आत्माराम यांचा मुलगा बाबा आत्माराम हजारे यांच्या हक्कात दि. ०९.०४.१९८१ रोजी पंजीबध्द मृत्यूपत्राच्या आधारे करुन दिलेली आहे. त्यामुळे सदर मृत्यूपत्राच्या आधारे बाबा हजारे संपुर्ण मालमत्तेचे कायदेशीर मालक झाले आहे व त्या मालमत्तेचा उपभोग घेत आहेत. वादी व त्यांच्या वडीलांनी सदर मृत्यूपत्रास कधीही आव्हाहन केलेले नाही. वाद घर मालमत्ता ही वर नमुद शेत मालमत्तेचा भाग आहे. त्यामुळे वादीचे वडील गंगाराम हे वाद घर मालमत्तेचे कधीही मालक नव्हते व नाही. वाद घर मालमत्ता ही कृषक जागेत नसून ग्रामपंचायत कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही वाद घरात ग्रामपंचायतव्दारे विद्युत पाणी कधीही पुरविल्या गेले नाही. बाबा उर्फ पुरुषोत्तम हजारे

यांनी दि. ०१.०१.२०२१ रोजी शेत सर्वे क्र. १९७ ही शेतजमीन प्रतिवादी क्र. १ व २ यांना विक्री केली. वादातील घर मालमत्ता ही सदर शेतात आहे. त्यामुळे प्रतिवादी हे वाद मालमत्तेचे कायदेशीर मालक व कब्जेदार असून वादीचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. वाद मालमत्तेवर पुर्वी बाबा हजारे यांची मालकी व ताबा होता. त्यानंतर प्रतिवादी यांचा ताबा आहे. वादीचे वडील गंगाराम यांनी ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संगणमत करुन बनावटी नोंद केलेली आहे. त्यामुळे वादीचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीचे कथन ऐकले. वादी तर्फे ॲड. डी. एम. धांदे यांनी युक्तीवाद केला व प्रतिवादींतर्फे ॲड. पी. जी. धारपुरे यांनी युक्तीवाद केला. दोन्ही पक्षाचे कथन, अभिलेखावरील दस्ताऐवज तसेच दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकून खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यापुढे खाली दिलेल्या कारणमिमांसेवरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहे.

अ. क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	वादीची प्रथमदर्शनी केस आहे हे वादी सिध्द करतो काय ?	...होय
२.	सोयीचे पारडे हे वादीच्या बाजुने आहे हे वादी सिध्द करतो काय ?	... होय
३.	तात्पुरता मनाई हुकुम पारीत न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होते काय ?	... होय
४.	कोणता आदेश ?	.... अंतिम

		आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

५. वादी तर्फे ॲड. डी. एम. धांदे यांनी युक्तीवाद केला त्यांनी युक्तीवाद केला की, वादातील घर मालमत्ता ही कोलबा यांच्या मालकीची होती व त्यानंतर ती मालमत्ता गंगाराम यांच्या ताब्यात आली व त्यानंतर ती वादी सुधाकर यांच्या ताब्यात आली. सदर वाद मालमत्तेच्या कर आकारणी उता–यात वादातील घर हे वादीच्या नावाने आहे. तसेच वादीने त्याबाबतचे कर देखील भरलेले आहे. सदर शेत मालमत्ता ही वादीच्या ताब्यात असल्याबाबत वादीची आई लक्ष्मीबाई गंगाराम हजारे यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे श्रीराम ज्ञानबाजी कामडी यांचे देखील शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे वादातील घर वादीच्या मालकी व कब्जात आहे. प्रतिवादींनी वादीच्या कब्जास अडथळा करुन वादीला कुंपण बांधण्यास अडथळा केला तसेच वादीचे घर पाडण्याची धमकी दिली. त्यामुळे वाद घर मालमत्तेवरील वादीच्या ताब्यास प्रतिवादी अडथळा निर्माण करण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रतिवादींनी वादीचे घर व खाली जागेवर असलेल्या वादीच्या कब्जास स्वतः किंवा इतरांमार्फत अडथळा करु नये तसेच दावा निकाली लागेपर्यंत वादीचे घर पाडण्याचा प्रयत्न करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम पारित करण्यात यावा अशी प्रतिवादी तर्फे विनंती केली आहे. वादीच्या वकीलांनी खालील केसचा आधार घेतला.

***Corporation of the City of Banglore vs. M. Papaiah and Ors., AIR** 1989 **SC** 1809* या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालयानी निर्णय दिले आहे की, “We do agree that the suit cannot be dismissed on the ground that the relief of declaration of title and possession has not been specifically mentioned in the plaint.”

६. याउलट प्रतिदाव्यातील प्रतिवादींतर्फे ॲड. पी. जी. धारपुरे यांनी युक्तीवाद

केला त्यांनी युक्तीवाद केला की, वादातील घर मालमत्ता ही कोलबा यांच्या मालकीची होती. ग्रामपंचायत रिकॉर्डला गंगारामच्या नावाची नोंद कोणत्या आधारावर घेण्यात आली याबद्दल वादीने उल्लेख केलेला नाही. त्याचप्रमाणे केवळ कर आकारणी किंवा ग्रामपंचायत अभिलेखावर नाव असल्यामुळे वादीच्या त्या मालमत्तेवर मालकी हक्क होत नाही. वादातील मालमत्ता ही शेत क्रमांक १९७ चा भाग आहे. कोलबा यांनी सदरची शेत मालमत्ता बाबाराव उर्फ पुरुषोत्तम हजारे यांच्या नावाने मृत्यूपत्र करुन दिले. सदर बाबाराव हजारे यांनी वादातील मालमत्ता ही प्रतिवादी क्र. १ व २ यांना विक्री केलेली आहे. त्यामुळे वादी हे सदर शेत मालमत्तेचे मालक असून त्यांच्या कब्जात आहे. वादीने सदर जागेवर कुंपण करुन घेण्याच्या प्रयत्नात असल्यामुळे प्रतिवादींनी त्यांना नोटीस दिले व त्यात सुध्दा वादातील शेत मालमत्ता ही त्यांच्या मालकीची असल्याचे सांगितले असे असुन देखील वादीने केवळ कायमच्या मनाई हुकुमाचा दावा दाखल केला. वाद मालमत्तेच्या मालकीविषयी कोणतीही घोषणा करुन मिळण्याबाबत मागणी त्यांनी केलेली नाही. त्यामुळे वादीचा दावा विधीग्राहय नाही. वादीने बरीचशी बाब लपवून प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे सुध्दा वादीचा दावा खारीज होण्यास पात्र आहे. तसेच वादीला तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे प्रथम दर्शनी केस वादीच्या बाजुने नाही, त्यामुळे वादीचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे. प्रतिवादीच्या वकीलांनी खालील केसचा आधार घेतला.

१**) Anthula Sudhakar Vs. P. Buchi Reddy and others, 2008 (5) ALL MR 451 (S.C.),** या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालयानी निर्णय दिले आहे की, “We may however clarify that a prayer for declaration will be necessary only if the denial of title by the defendant or challenge to plaintiff's title raises a cloud on the title of plaintiff to the property. A cloud is said to raise over a person's title, when some

apparent defect in his title to a property, or when some prima facie right of a third party over it, is made out or shown. An action for declaration, is the remedy to remove the cloud on the title to the property. On the other hand, where the plaintiff has clear title supported by documents, if a trespasser without any claim to title or an interloper without any apparent title, merely denies the plaintiff's title, it does not amount to raising a cloud over the title of the plaintiff and it will not be necessary for the plaintiff for the plaintiff to sue for declaration and a suit for injunction may be sufficient. Where the plaintiff, believing that defendant is only a trespasser or a wrongful claimant without title, files a mere suit for injunction, and in such a suit the defendant discloses in his defence the details of the right or title claimed by him, which raises a serious dispute or cloud over plaintiff's title, then there is a need for the plaintiff, to amend the plaint and convert the suit into one for declaration. Alternatively, he may withdraw the suit for bare injunction, with permission of the court to file a comprehensive suit for declaration and injunction. He may file the suit for declaration with consequential relief, even after the suit for injunction is dismissed, where the suit raised only the issue of possession and not any issue of title."

२) Harcharanjit Singh Thind vs. Deeksha Thind and others

2008(3) Mh.L.J. 587 या न्यायनिर्णयात मा. न्यायालयानी निर्णय दिले आहे की, "The party who supprsses material facts from the court, does not deserve the grant of any discretionary relief, much less a temporary injunction"

३) Sonabai Ramchandra Khot and others vs. Bhimrao Krishna Khot and others 2012(6) ALL M R 395 या न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालयानी निर्णय दिले आहे की, "Entries cannot be treated as document of title. Entries have only presumptive value and do not confer any right qua the property in respect of which they are made."

७. दोन्ही पक्षाच्या कथनाचे अवलोकन केले असता असेच अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींनी घर व खाली जागा वरील वादीच्या कब्जास अडथळा करु नये व घर पाडण्याचा प्रयत्न करु नये याकरीता कायमच्या मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे वाद घर मालमत्ता ही त्याच्या मालकीची असून त्याच्या कब्जात आहे. त्यामुळे प्रतिवादींनी सदर वाद घर मालमत्ता व समोरील जागेवर वादीच्या कब्जास अडथळा करण्याची तसेच वादीला कुंपण बांधण्यास अडथळा करण्याचा कोणताही अधिकार नाही.

८. वादीने त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ ग्रामपंचायत वाघोडा यांचे दि. १०.०२.२००४ रोजीचा ठराव क्रमांक ३३/२ ची प्रत दाखल केलेली आहे. सदर ठरावाप्रमाणे लिहून देणार गंगाराम कोलबाजी हजारे व लिहून घेणार म्हणून सुधाकर गंगारामजी हजारे यांचे नाव दिसुन येत असून उद्देशाने मंजूर करुन नोंद घेण्याची सचिवाला आदेश दिल्याचे दिसुन येते. तसेच वादीने दाखल केलेले सन २००१–२००२ ची कर आकारणीचे रजिस्टर चे अवलोकन केले असता मासिक ठराव क्रमांक १३/२ दि. १०.०२.२००४ रोजी गंगाराम कोलबा हजारे यांच्या नामाऐवजी सुधाकर गंगाराम हजारे

यांच्या नावाची नोंद घेतली असल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे सन २०२०–२०२१ चे कर आकारणी नोंदवहीच्या उता–याचे अवलोकन केले असता मालमत्ता क्रमांक २६ वर वादी सुधाकर गंगाराम हजारे यांच्या नावाची नोंद दिसुन येते. तसेच कर भरल्याच्या पावतीवर मालमत्ता क्र. ३० वर वादी सुधाकर गंगारामजी हजारे यांचे नाव दिसुन येते. तसेच २०२०–२०२१ च्या कर आकारणी नोंदवहिच्या उता–यावर मालमत्ता क्रमांक ३० वर सुधाकर गंगाराम हजारे यांच्या नावाची नोंद दिसुन येते. त्याचप्रमाणे वीज बिलाच्या थकबाकी भरण्याबाबत गंगाराम कोलबाजी हजारे यांना सहाय्यक अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित यांनी दि. २७.०५.२०१६ रोजी नोटीस दिल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे वादीने कर आकारणी भरल्याबाबतची पावती दाखल केल्याचे दिसते त्यावर सुध्दा मालमत्ता क्रमांक २६ वर वादी सुधाकर गंगाराम हजारे यांचे खातेदार म्हणून नाव लिहले असल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे श्रीराम ज्ञानबाजी कामडी यांनी त्यांच्या शपथपत्रात वादी सुधाकर व त्याची आई यांचा वादातील घर क्र. ३०, जुना घर क्र. २६ च्या कब्जात आहेत त्या घरामध्ये गुरे बांधल्या जात नाही. त्यावर बाबाराम यांचा कब्जा पाहीलेला नाही असे सांगितले आहे.

९. याउलट प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादातील घर मालमत्ता ही शेत सर्वे क्र. ७५/१ मध्ये असून कोलबा यांनी सदरची शेत मालमत्ता बाबाराव हजारे यांच्या नावाने मृत्यूपत्राव्दारे करुन दिले व बाबाराव हजारे यांनी ती शेत मालमत्ता प्रतिवादींनी दि. ०१.०१.२०२१ रोजीच्या विक्रीपत्राव्दारे विक्री केली. त्यामुळे सदर शेत मालमत्ता व घर मालमत्ता ही प्रतिवादीच्या ताब्यात असून त्याच्या मालकीची आहे. त्यामुळे सदर मालमत्तेवर वादीचे वडील गंगाराम किंवा वादी यांचा कोणताही अधिकार व हक्क नाही व तेथे त्यांचा कधीही कब्जा नव्हता.

१०. प्रतिवादींनी त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ दि. ०९.०४.१९८१ रोजीच्या मृत्यूपत्राची प्रत दाखल केलेली आहे. सदर मृत्यूपत्राव्दारे कोलबाजी हजारे यांनी शेत सर्वे

क्र. ७५/१ आराजी ०.०८ हेक्टर आर शेत सर्वे क्र. ५/२ आराजी ०.८१ हेक्टर आर व शेत सर्वे क्र. ६/२ क आराजी ०.२२ हेक्टर आर ही शेतजमीन त्यांचा नातू बाबा आत्माराम हजारे यांच्या नावे करुन दिल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे प्रतिवादींनी दि. ०१.०१.२०२१ रोजीच्या विक्रीपत्राची प्रत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी बाबाराव उर्फ पुरुषोत्तम आत्माराम हजारे यांच्याकडून शेत सर्वे क्र. १९७ आराजी ०.०८ हेक्टर आर खरेदी केल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे प्रतिवादींनी दि. ०५.०८.२०२१ रोजी वादीला पाठविलेल्या नोटीसाची प्रत दाखल केली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी त्याच्या केसच्या समर्थनार्थ पुरुषोत्तम उर्फ बाबाराव आत्माराम हजारे यांचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यांनी त्याच्या शपथपत्रात लबा यांनी शेत सर्वे क्र. ७५/१ व इतर मालमत्ता दि. ०९.०४.१९८१ रोजीच्या मृत्यूपत्राच्या आधारे त्यांच्या नावाने करुन दिले व त्यामुळे ते सदर मालमत्तेचे कायदेशीर मालक झाले आहेत असे सांगितले आहे. सदर मालमत्तेवर त्यांचा ताबा होता व विक्रीनंतर प्रतिवादींचा ताबा आहे असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे श्रीराम लक्ष्मण बारंगे यांचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यांनी सुध्दा वाद मालमत्ता ही शेतात असून तिचा वापर गुरे बांधण्यासाठी तसेच शेत उपयोगी अवतारे ठेवण्याकरीता प्रतिवादी क्र. १ व २ करीता आहेत व प्रतिवादींचे वडील मधुकर यांनी सदर शेतात गोठा आहे व सदर गोठयाकरीता पुरुषोत्तम यांनी जागा दिलेली आहे. प्रतिवादींनी वाद घराची जागा खरेदी केली तेव्हापासून त्याच्या ताब्यात आहेत असे शपथपत्रात सांगितले आहे.

११. अभिलेखावरील दस्तऐवज व दोन्ही पक्षाच्या कथनाचे अवलोकन केले असता वादीच्या कथनाप्रमाणे ग्रामपंचायत ठरावाप्रमाणे त्याचे नाव वादातील घर मालमत्तेवर चढविण्यात आले व त्याकरिता त्याचे वडील गंगाराम यांनी लिहून दिले आहे. वादीचे घर ट्रॅक्स पावती, तसेच कर आकारणी उतारा दाखल केलेला आहे. निश्चितच कर आकारणी उतारा हा मालकी हक्काबाबतचा नसुन केवळ कर आकारणी संदर्भातील आहे. त्यामुळे स्पष्ट दस्तऐवजांवरुन वादीचा मालकी हक्क सिध्द होत नाही.

१२. प्रतिवादीने दाखल केलेलया दस्तऐवजावरुन कोलबा हजारे यांनी बाबाराव हजारे यांना शेत सर्वे क्र. ७५/१ शेतजमीनीचे मृतयुपत्र करुन दिले व बाबाराव हजारे यांनी शेत सर्वे क्र. १९७ प्रतिवादींना विक्री केली असे दिसून येते. परंतु शेत सर्वे क्र. ७५/१ हाच शेत सर्वे क्र. १९७ असल्याबाबत तसेच सर्वे क्र. १९७ मध्ये वादातील घर असल्याबाबत कोणताही पुरावा प्रतिवादींनी दिलेला नाही. केवळ प्रतिवादी व बाबाराव हजारे च्या कथनाप्रमाणे वादातील घर हे शेत सर्वे क्र. १९७ चा भाग आहे. परंतु मृत्युपत्र दि. ९.४.१९८१ किंवा विक्रीपत्र दि.१.१.२०२१ मध्ये कुठेही वादातील घराचा उल्लेख दिसून येत नाही. वादातील घर हे नवीन बांधकाम नसून फार जुने घर असल्याचे वादीने दाखल केलेल्या छायाचित्रावरुन दिसून येते. वादीचा वादपत्रात वादघराच्या पुर्वेस पांधन, पश्चिमेस मधूकर हजारे यांचा कोठा, उत्तरेस प्रतिवादीचे शेत सर्वे क्र. १९७ व दक्षिणेस मनोहर श्रीराम कामडीचे घर नमूद केलेले आहे. प्रतिवादीने दाखल केलेल्या विक्रीपत्रात त्यांनी खरेदी केलेल्या शेत सर्वे क्र. १९७ च्या पुर्वेस पांधन, पशिमेस व उत्तरेस नाला व दक्षिणेस श्रीराम कामडी व पंजाबराव कामडी यांचे शेत असे नमूद असल्याचे दिसून येते. वादीने दाखल केलेल्या छायाचित्रात वादातील घराच्या बाजूला विटाचे घर दिसून येते. प्रतिवादीनी दाखल केलेल्या छायाचित्राचे अवलोकन केले असता वादातील घराच्या बाजूला विटाचे घर व मागील बाजुला बैलांचा कोठा असल्याचे दिसून येते. म्हणजेच वादघराच्या दक्षिणेस श्रीराम कामडी यांचे घर असल्याचे दिसून येते. शेत दिसून येत नाही. श्रीराम कामडी यांनी सुध्दा त्यांचे शपथपत्रात वादातील घरावर वादी व त्याची आईचा कब्जा असल्याचे सांगितले आहे. त्याचप्रमाणे वादातील जागा ही घरमालमत्ता असून खाली शेत किंवा खुली जागा नाही.

१३. तसेच वादीने दाखल केलेल्या दस्तऐवजावरुन व शपथपत्रावरुन वादातील घरावर वादीचा कब्जा असल्याचे दिसून येते. प्रतिवादीने पाठविलेल्या नोटीस मध्ये वादातील घर त्यांच्या कब्जात आहे किंवा दि. १.१.२०२१ रोजीच्या विक्रीपत्रापासून ते

वादातील घराच्या व त्याच्या आजुबाजूच्या जागेच्या कब्जात आहेत व वादीने बडजबरीने वादातील घराच्या कब्जा घेण्याचा प्रयत्न केला असे कथन नाही. त्यामुळे वादातील घर हे वादीच्या कब्जात असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याच प्रमाणे प्रतीवादींनी वादीस खांब गाडण्यास अडथळा केल्याचे नोटिस दि.५.८.२०२१ व दोन्ही पक्षाच्या कथनावरुन प्रथमदर्शनी दिसुन येते. वादीतील घर हे शेत सर्वे क्र. १९७ चा भाग आहे किंवा नाही व त्यावर प्रतिवादी यांचा मालकीहक्क आहे काय हे पुराव्यानंतर गुणवत्तेवरच सिध्द होउ शकेल.

१४. **Anthula Sudhakar Vs. P. Buchi Reddy and others, 2008 (5) ALL MR 451 (S.C.),** या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालयानी निर्णय दिले आहे की, “To summarize the position in regard to suits for prohibitory injunction relating to immovable property is as under:
a) where a cloud is raised over plaintiffs title and he does not have possession, a suit for declaration and possession, with or without a consequential injunction, is the remedy. Where the plaintiff's title is not in dispute or under a cloud, but he is out of possession, he has to sue for possession with a consequential injunction. Where there is merely an interference with plaintiff's lawful possession or threat of dispossession, it is sufficient to sue for an injunction simplicitor.
b) As a suit for injunction simplicitor is concerned only with possession, normally the issue of title will not be directly or substantially in issue. The prayer for injunction will be decided with reference to the finding on possession. But in cases where de jure possession has to be established on the basis of title to the property, as in the case of vacant sites, the issue of title may directly and substantially arise for consideration, as without a finding thereon, it will not be possible to decide the issue of possession.”

१५. वादीने दाखल केलेले शपथपत्र व अभिलेखावरील इतर दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता वादातील जागा ही घरमालमत्ता असून खाली शेत किंवा खुली जागा नाही. वरिल न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता सध्यस्थितीत वादातील घर व जमीनीवर वादीचा ताबा आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते. वादातील घरमालमत्तेचा कर उता–यावर वादीचे नाव दिसुन येते. त्याने दाखल केलेल्या साक्षीदाराच्या शपथपत्रावरुन वादी वादातील घरमालमत्तेचा ताब्यात आहे असे दिसुन येते. प्रतीवादींनी वादीस खांब गाडण्यास अडथळा केल्याचे दिसून येते.

१६. एकंदरीत वरील सर्व विवेचनावरुन वादातील घर हे वादीच्या ताब्यात आहे. प्रतिवादीने वादीचे मालकी हक्क तसेच वादातील घरावरील ताबा नाकारला आहे. त्याचप्रमाणे वादातील घरावरील वादीच्या मालकी हक्काला व ताब्याला नाकारले असुन प्रतिवादी यांनी अडथळा निर्माण केले असल्याचे दिसुन येते. त्यामुळे एकंदरीत सकृत दर्शनी केस ही वादीच्या बाजुने असल्याचे दिसुन येते. प्रतिवादी यांनी वाद घरावरील वादीचा ताबा जबरीने हिसकावून घेतल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल. त्यामुळे त्यांनी वादातील घराच्या व खाली जागेच्या कब्जास अडथळा करू नये असा कायमच्या मनाई हुकुमाकरिता दावा दाखल केलेला आहे. अशापरिस्थितीत वादी यांच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकुम पारित केल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार नाही. याउलट वादीच्या ताब्यातील वादातील घर पाडल्यास किंवा त्यासमोरिल खाली जागेवरिल कब्जास अडथळा केल्यास वादीचे नुकसान होईल. त्यामुळे सोयीचे पारडे हे वादी हिच्या हक्कात आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र. ४ करिता</u>

१७. एकंदरीत वरील विवेचनावरुन सुकृतदर्शनी केस ही वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे तात्पुरता मनाई हुकुम पारीत न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार तसेच

सोयीचे पारडे देखील वादीच्या बाजुने आहे हे वादीने सिध्द केले आहे. अशा परिस्थितीत त्यामुळे वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकुम पारीत करणे योग्य होईल. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज नि. क्र. ०५ मंजुर करण्यात येत आहे.

२. दाव्यातील प्रतिवादी यांनी वादातील घरमालमत्तेवरील वादीच्या ताब्यास स्वत: किंवा इतरांमार्फत दावा अंतिम निकाली लागेपर्यंत अडथळा करु नये.

३. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

स्वा /-

(मंजुषा एम. अलोणे)

दिवाणी व फौजदारी न्यायाधीश,

कारंजा घा.

ठिकाणः कारंजा घा.

दि. १२.०४.२०२२